# व्याकरण

## १. शब्दशक्ती

माणसांचे परस्परांतील व्यवहार भाषेच्या माध्यमातून चालतात. भाषेच्या माध्यमातूनच साहित्याची निर्मिती होते. दोन्ही ठिकाणची भाषा परिणामकारक व वैशिष्ट्यपूर्ण असते. जसा चित्रकाराचा अनुभव रंगांमधून, गायकाचा अनुभव सुरांतून, तसा लेखकाचा अनुभव शब्दांमधून व्यक्त होतो. संदेश, भावना, विचार यांची देवाणघेवाण होण्यासाठी व त्याची प्रभावी अभिव्यक्ती होण्यासाठी योग्य, सूचक आणि पोषक शब्दांची योजना करावी लागते. अनेक शब्दांमधून योग्य शब्दांची निवड करण्याची क्षमता माणसात असायला हवी. तिचा अचूक वापर करण्याची कौशल्ये त्याला ज्ञात असायला हवीत. यासाठी शब्दशक्तींची ओळख करून घेणे उचित ठरते.

**खालील वाक्यांचे काळजीपूर्वक वाचन करून त्यांचे निरीक्षण करा.**

(१) मी आज मोठा दगड पाहिला.

(२) त्यांचे बोलणे म्हणजे काळ्या दगडावरची रेघ.

(३) माझ्या मना बन दगड.

प्रस्तुत वाक्यांच्या निरीक्षणानंतर असे लक्षात येईल, की प्रत्येक वाक्यात **‘दगड’** हा शब्द आहे. प्रत्येक वाक्यातील **‘दगड’** शब्दाचा अर्थ **‘दगड’** हाच असला तरी, या शब्दात मूळ अर्थाव्यतिरिक्त वेगळा असा अर्थ संदर्भाने प्रकट करण्याचे विशिष्ट प्रकारचे सामर्थ्य आहे. शब्दाच्या या सामर्थ्यालाच **‘शब्दशक्ती’** म्हणतात. शब्दाच्या अंगी एकूण तीन प्रकारच्या शब्दशक्ती असतात.

**शब्दशक्ती**

(१) अभिधा (२) लक्षणा (३) व्यंजना

**(१) अभिधा–** वरील तिन्ही उदाहरणांतून आपल्याला असे लक्षात येते, की पहिल्या वाक्यातील **‘दगड’** शब्द उच्चारल्यानंतर त्याचा शब्दश: अर्थ कळतो. पहिल्या वाक्यात दगड म्हणजे ठरावीक आकाराची एक जड वस्तू. हा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची ही जी शक्ती आहे तिला **‘अभिधा’** शक्ती असे म्हणतात.

**अभिधा शक्तीची वैशिष्ट्ये**

- ही शब्दाची पहिली शक्ती आहे.
- वाचल्याबरोबर शब्दश: अर्थ कळतो.
- तो अर्थ शब्दकोशातही असतो.
- अभिधा शक्तीच्या साहाय्याने प्रकट होणाऱ्या या अर्थाला **‘वाच्यार्थ’** म्हणतात.

(२) **लक्षणा–** दुसऱ्या वाक्यातील 'काळ्या दगडावरची रेघ' हा शब्दसमूह 'दगडावर काढलेली रेघ' या वाच्यार्थाबरोबरच त्याचे बोलणे 'कधीही नष्ट न होणारे' किंवा 'कायमस्वरूपी टिकणारे' असा दुसरा अर्थ सूचित करतो. म्हणजे शब्दश: अर्थ न घेता त्याच्याशी सुसंगत असलेला असा दुसरा अर्थ घ्यावा लागतो. दुसरा अर्थ सूचित करण्याच्या शब्दाच्या या शक्तीला **'लक्षणा'** असे म्हणतात.

**लक्षणा शक्तीची वैशिष्ट्ये**

- दुसरा अर्थ सूचित होतो.
- बहुतेक वेळी मूळ अर्थाला बाधा येते.
- मूळ अर्थ उपयोगी पडत नाही. संदर्भाने जुळलेला दुसरा अर्थ घ्यावा लागतो.
- लक्षणा शक्तीच्या साहाय्याने प्रकट होणाऱ्या या अर्थाला **'लक्ष्यार्थ'** म्हणतात.

(३) **व्यंजना–** तिसऱ्या उदाहरणातील 'माझ्या मना बन दगड.' या वाक्यातील **'बन दगड'** या शब्दसमूहाचा शब्दश: अर्थ घेतला तर भलताच अर्थ निघतो. **'मन घट्ट कर'** किंवा **'आघात सहन कर'** असा वेगळा सुसंगत अर्थ अधिक योग्य ठरतो. मूळ अर्थाला बाधा न आणता वेगळा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती असते तिला 'व्यंजना' असे म्हणतात.

**व्यंजना शक्तीची वैशिष्ट्ये**

- वेगळा अर्थ सूचित होतो.
- मूळ अर्थाला बाधा येत नाही.
- हा दुसरा सुसंगत अर्थ ही शक्ती वाचकांपर्यंत पोहोचवते.
- व्यंजना शक्तीच्या साहाय्याने प्रकट होणाऱ्या या अर्थाला **'व्यंग्यार्थ'** असे म्हणतात.

**व्यंग्यार्थाची गंमत–** 'सूर्य उगवला', असे वाक्य उच्चारल्यानंतर 'सूर्योदय झाला' हा वाच्यार्थ. सूर्योदय झाला, सकाळ झाली असे अर्थ जरी सकृतदर्शनी होत असले तरी व्यक्तिगणिक याचा अर्थ वेगवेगळा सूचित होऊ शकतो.

उदा.,

**सूर्योदय झाला.**

- काही व्यक्तींची झोपेतून उठण्याची वेळ झाली.
- झाडलोट करण्याची वेळ झाली.
- धार्मिक व्यक्तींची प्रार्थनेची वेळ झाली.
- मुलांची अंघोळीची वेळ झाली.

वाचन व लेखन करताना या तिन्ही शब्दशक्तींचे ज्ञान असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**शब्दशक्तींची गरज–**

(१) ललित वाङ्मयात अनुभवांचे दर्शन घडवण्यासाठी.

(२) शब्दांचा कोश प्रमाण मानला असला, तरी ललित लेखनात शब्द केवळ ज्ञान देण्यासाठी नसून कवींचा, लेखकांचा अनुभव सांगण्यासाठी असतात.

(३) लेखक/कवी यांना शब्दांच्या पलीकडचा भाव व्यक्त करण्यासाठी.

(४) मूळ भावार्थाशी संलग्न अर्थ व्यक्त करण्यासाठी.

(५) लेखकांच्या व कवींच्या भावच्छटा व्यक्त करण्यासाठी.

(६) काव्यात व्यंग्यार्थामुळे सूचकता व अधिक परिणामकारकता साधण्यासाठी.

**विविध उदाहरणे–**

| अभिधा | लक्षणा | व्यंजना |
|---|---|---|
| (१) राम एक राजा होता. | (२) यात काही राम नाही. | (२) त्याने राम म्हटले. |
| (२) तलावात भरपूर पाणी आहे. | (३) त्याच्या डोळ्यांतील पाणी आटले. | (३) लाथ मारेल तिथे पाणी काढेल. |
| (३) ही वाट डोंगरगावची आहे. | (४) त्या वेळी माझी वाट लागली. | (४) आपणच आपली वाट निर्माण करावी. |
| (४) बांगड्या रंगीत असतात. | (५) पानिपतावर सव्वा लाख बांगडी फुटली. | (५) अखेर येते निरोप घेऊन निवांत मार्गात ते कंकण |
| (५) मावळतीचा सूर्य सुंदर दिसतो. | (७) सूर्य अस्ताला गेला. | (७) त्याच्या जीवनाचा सूर्य अस्ताला गेला. |

## कृती

**(१) सूचनेनुसार सोडवा.**

**'मी वि. स. खांडेकर' वाचले. या वाक्यातील लक्ष्यार्थ लिहा.**

(अ) मी वि. स. खांडेकर यांना पाहिले.

(आ) मी वि. स. खांडेकर यांच्याशी बोललो.

(इ) मी वि. स. खांडेकर यांचे साहित्य वाचले.

**(२) मूळ शब्दशक्ती ........ आहेत.**

(अ) एक (आ) चार (इ) तीन

**(३) 'निवडणुका आल्या, की कावळ्यांची कावकाव सुरू होते.' या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.**

(अ) अभिधा (आ) लक्षणा (इ) व्यंजना

**(४) 'आपल्याभोवती वावरणाऱ्या कोल्ह्यांपासून दूरच राहावे.' या वाक्यातील 'कोल्हा' या शब्दातून व्यक्त होणारा लक्ष्यार्थ....**

(अ) जंगलातील धूर्त प्राणी

(आ) मळ्यातील मका खाणारा

(इ) धूर्त माणसे

**(५) 'घरावरून मिरवणूक गेली.' या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.**

(अ) अभिधा (आ) लक्षणा (इ) व्यंजना

**(६) 'मी एक लांडगा पाहिला.' या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.**

(अ) व्यंजना (आ) अभिधा (इ) लक्षणा

**(७) ‘समाजातील असले साप ठेचलेच पाहिजेत.’ या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.**

(अ) लक्षणा (आ) व्यंजना (इ) अभिधा

**(८) खालील तक्ते पूर्ण करा.**

**(अ) शब्दशक्ती ओळखा.**

| अ. क्र. | शब्द | वाक्य | शब्दशक्ती |
|---|---|---|---|
| (१) | -- | मी निबंध लिहिला. | |
| (२) | -- | त्याच्या मनात काहूर माजले. | |
| (३) | -- | ताजमहाल सुंदर आहे. | |
| (४) | -- | फारच शहाणी आहेस तू! | |
| (५) | -- | हा किल्ला बुलंद आहे. | |

**(आ) शब्दशक्तीनुसार शब्द व वाक्य लिहा.**

| अ. क्र. | शब्दशक्ती | शब्द | वाक्य |
|---|---|---|---|
| (१) | अभिधा | -- | -- |
| (२) | लक्षणा | -- | -- |
| (३) | व्यंजना | -- | -- |

**(इ) शब्दशक्तीनुसार तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | शब्दशक्ती | शब्द | वाक्य |
|---|---|---|---|
| (१) | -- | सिंह | -- |
| (२) | लक्षणा | -- | -- |
| (३) | -- | -- | पांढरे ते सारेच बगळे नसतात. |